क्र.का.4/प्र.क्र.172/07/2009
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,पुणे1
दिनांक 14/01/2009

**विषय**:- बोगस व्यक्तींव्दारे मिळकत विक्रीस प्रतिबंध घालण्यासंदर्भात.

**परिपत्रक:-**

नोंदणीसाठी दाखल करण्यात आलेल्या दस्तऐवजाचे निष्पादन केल्याबाबत कबुलीजबाब देणा-या पक्षकाराच्या अभिन्नतेविषयी (ओळखीशिवाय) खात्री करताना निष्पादकाची ओळख पटविणा-या व्यक्तींची अधिक काटेकोरपणे तपासणी करण्याच्या सूचना संदर्भित परिपत्रकाव्दारे देण्यात आल्या आहेत.

योग्य पुरावा सादर करणा-या व्यक्तीचीच ओळख ग्राहय धरावी, असे उक्त परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात आले असून, अशा पुराव्यांची यादी कळविण्यात आली आहे. उक्त यादीमध्ये.

अ) जेष्ठ नागरिकांचे ओळखपत्र,

आ) झोपडपट्टीधारकाचे ओळखपत्र / फोटोपास

अशा पुराव्यांचा समावेश करण्यात येत आहे.

तरी सर्व दुय्यम निंबधकांनी संदभिय परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

सही/-रामराव शिनगारे
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक.**
**महाराष्ट्र राज्य,पुणे**.

**प्रति**:-

1) सर्व दुय्यम निंबधक (संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षकांमार्फत )
2) सर्व सह जिल्हा निंबधक (संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षकांमार्फत).

**प्रत**- 1) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक

2/- प्रस्तुत परिपत्रकाची प्रत आपल्या प्रादेशिक विभागातील दुय्यम निंबधक व सह जिल्हा निंबधकांना तात्काळ अग्रेषित करावी.

2) सर्व कार्यासन अधिकारी नोंदणी महानिरीक्षक कार्यालय पुणे.